**ठळक बातम्या**

- औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ ला संसदेची मंजुरी,

- भारत अमेरिका व्यापार कराराबाबत लोकसभेत गदारोळ, विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव

- सरकार स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी काम करत असल्याचं राज्यसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात देशातल्या १० प्रमुख कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला संमिश्र प्रतिसाद

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा नामिबियाशी सामना सुरु

<><><><><>

औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ ला आज संसदेची मंजुरी मिळाली. कामगार संघटना कायदा १९२६, औद्योगिक रोजगार कायदा १९४६ आणि औद्योगिक विवाद कायदा १९४७ यांच्या ऐवजी औद्योगिक संबंध संहिता २०२० लागू करण्यात आली आहे. याच्या अंमलबजावणीत भविष्यात कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी औद्योगिक संबंध संहिता सुधारणा विधेयक २०२६ आणलं गेलं आहे.

लोकसभेत या विधेयकावरल्या चर्चेला कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सभागृहात उत्तर दिलं. नवा कामगार कायदा कामगारांच्या हितासाठी आणला गेल्याचं देशातल्या सतरा कामगार संघटनांनी मान्य केलं  असून मोजक्या संघटनांचा याला विरोध असल्याचं मांडवीय म्हणाले. हा कायदा मजुरांना किमान वेतनाची हमी देतो, कोणत्याही राज्य सरकारला किमान वेतनापेक्षा कमी वेतन देता येणार नाही, असं ते म्हणाले. महिला आणि पुरुषांना समान वेतन तसंच वेळेवर वेतन मिळण्याची हमी या कायद्यामुळे मिळणार आहे. चाळीस वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या कामगारांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली जाईल, या कायद्यामुळे नवीन रोजगार निर्मिती होईल, असंही मांडवीय म्हणाले.

हे विधेयक म्हणजे कोणत्याही प्रकारची सुधारणा नाही, तरुणांना रोजगार संरक्षण देण्याऐवजी सरकार ते अधिक कमकुवत करत असल्याची टीका या चर्चेवेळी बोलताना काँग्रेस खासदार के सुरेश यांनी केली. सरकार कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे खासदार अफजल अन्सारी यांनी केला. कंत्राटी कामगारांना या विधेयकामुळे रोजगाराची सुरक्षा मिळेल का असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी विचारला. तर हा कायदा  मुठभर भांडवलदारांच्या हितासाठी आणला जात असल्याचा आरोप भाकप माले चे खासदार सुदामा प्रसाद यांनी केला. मुस्लिम लिगचे खासदार ई टी मुहम्मद बशीर यांनीही या विधेयकाला विरोध केला.

राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे, तृणमूल काँग्रेसच्या डोला सेन, बीजू जनता दलाचे निरंजन बिशी,  भाकपचे संदोष कुमार, माकपचे विष्णू दासन, अण्णा द्रमुकचे एम. थंबी दुराई, द्रमुकचे आर. गिरीराजन यांनी चर्चेत भाग घेतला. हे विधेयक कामगार विरोधी असल्याची टीका काँग्रेसचे जयराम रमेश यांनी केली.

**<><><><><>**

सत्ताधारी आणि विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब होण्याआधी दोन वेळा तहकूब झालं.

दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशन, USAID, फोर्ड फाऊंडेशन अशा संस्थांशी संधान साधत भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.

**- - होल्ड बाईट दुबे - - -**

**<><><><><>**

ओदिशामधल्या एका अंगणवाडी केंद्रामधल्या जातीय भेदभावाचा मुद्दा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. ओदिशामधल्या या अंगणवाडीत दलित महिलेनं बनवलेलं अन्न आपल्या मुलांनी खायला विशिष्ट समुदायातल्या लोकांनी नकार दिल्याचं वृत्त माध्यमांमधे आलं होतं. मुलांच्या शारीरीक आणि बौद्धिक

विकासामधे अंगणवाडीची भूमिका महत्त्वाची असते, तिथंच जर अशा प्रकारचा भेदभाव होत असेल तर याचा मुलांच्या वाढीवर दूरगामी परिणाम होईल, अशी भिती खरगे यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

आर्थिक वाढ आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देऊन सरकार स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. त्या आज राज्यसभेत अर्थसंकल्पावरल्या चर्चेला उत्तर देत होत्या. सरकारला महागाई नियंत्रणात ठेवण्यात तसंच विकासदर कायम ठेवण्यात यश आल्याचं त्या म्हणाल्या. २०२५-२६ मध्ये देशाचं सकल देशांतर्गत उत्पादन ७ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढलं असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट सीतारामन (३१ सेकंद)**

देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे, या अर्थसंकल्पातून देशांतर्गत उत्पादन क्षेत्राविषयीचा सरकारचा दृष्टीकोन दिसून येतो, असं सीतारामन म्हणाल्या. बायोफार्मा, सेमिकंडक्टर मिशन २.०, वस्त्रोद्योग आदी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे, मनुष्यबळाचा विकास करण्यावर सरकारने लक्ष केंद्रित केल्याचं त्यांनी नमूद केलं.

त्याआधी सभागृहात सर्व पक्षाच्या सदस्यांनी अर्थसंकल्पावर चर्चा केली.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या अप्रत्यक्ष करांच्या माध्यमातून नव्याने केलेल्या सुधारणा सरकारच्या विकासाभिमुख दृष्टीकोनाला पूरक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क विभागाचे अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी आज केलं. विभागातर्फे मुंबईतल्या न्यू कस्टम हाऊस इथे आयोजित संवाद सत्राला ते संबोधित करत होते. या सत्रात व्यापार संघटना, वाणिज्य मंडळांसह माध्यम प्रतिनिधी सहभागी झाले होते. या सत्रात चतुर्वेदी यांनी यंदाच्या अर्थसंकल्पीय धोरणातल्या बदलांविषयी सविस्तर माहिती दिली.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांच्या विरोधात प्रमुख कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला आज देशाच्या विविध भागात संमिश्र प्रतिसाद मिळाला. नवीन कामगार कायदे, बीज विधेयक, वीज सुधारणा विधेयक तसंच अणुऊर्जा विकास विधेयक मागे

घ्यावे, विकसित भारत जी राम जी योजनेऐवजी मनरेगाचं पुनरुज्जीवन करावं या आणि इतर मागण्यांसाठी विविध कामगार संघटनांनी एकत्र येऊन आजचा बंद पुकारला आहे. झारखंडमधे बँका आणि खाणींच्या कामावर बंदचा परिणाम झाला असल्याचं संपकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

आसाममधे बंदच्या  प्रतिसादात रस्ते ओस पडले होते. बिहार आणि ओदिशामधे संपकऱ्यांनी निदर्शनं केली. ओदिशात बंदमुळे आवश्यक सेवांवर परिणाम होऊन जनजीवन प्रभावित झालं. हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्रात ठिकठिकाणी विविध कामगार संघटनांनी निदर्शनं केली.

पश्चिम बंगाल, त्रिपुरा आणि गुजरातमधे आंदोलनाचा प्रभाव फारसा जाणवला नाही, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

आर्थिक फसवणुकीप्रकरणातला आरोपी विजय मल्ल्या भारतात परतल्यानंतरच त्याने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होईल या आपल्या भूमिकेचा मुंबई उच्च न्यायालयाने आज पुनरुच्चार केला. मल्ल्या याने फरार  आर्थिक गुन्हेगारी कायदा अर्थात FEO कायद्याला आव्हान देणारी याचिका दाखल केली आहे. बँकांची मागणी चुकीची असल्याचा त्याचा दावा असतानाही तपासणी संस्थांनी त्याची मालमत्ता ताब्यात घेतल्याचं त्याच्या वकिलांनी सांगितलं परंतु सुनावणीसाठी मल्ल्याने भारतात परतणं आवश्यक असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ५५९ अंकांची घसरण झाली आणि तो ८३ हजार ६७५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही१४७ अंकांची घसरण  नोंदवत २५ हजार ८०७ अंकांवर बंद झाला. भारतीय रुपयात मात्र आज वाढ झाली. परकीय चलन विनिमय बाजारात रुपया ११ पैशांनी वाढून अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९० रुपये आणि ५९ पैशांवर बंद झाला.

<><><><><>

बांगलादेशात तेराव्या संसदीय निवडणुकीसाठी आज सकाळी साडेसात वाजता सुरू झालेलं मतदान संध्याकाळी साडेचारला संपलं. दुपारी १२ पर्यंत फक्त ३२ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक आयोग सचिवालयानं सांगितलं.

आपल्या पक्षाला विजय मिळेल असा विश्वास बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारीक रहमान यांनी व्यक्त केला. ढाका इथं आज सकाळी त्यांनी मतदान केलं. त्यानंतर ते बोलत होते.

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार करारामुळे भारताची व्यापारी शिल्लक ९ हजार कोटी डॉलर्सने वाढेल असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या अहवालात व्यक्त केला आहे. जीडीपीच्या १ पूर्णांक १ दशांश टक्के एवढी ही रक्कम आहे. या करारामुळे परदेशी चलनसाठ्यात तीस लाख डॉलर्सची भर पडेल असा अंदाज आहे.

भारताकडून अमेरिकेला सर्वाधिक निर्यात होणाऱ्या १५ वस्तूंची निर्यात ९कोटी ७० लाख डॉलर्सने वाढवता येईल असा विश्वास भारतीय स्टेट बँकचे मुख्य आर्थिक सल्लागार सौम्य कांती घोष यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरू आहे. नामिबियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ बाद १४४ धावा झाल्या होत्या.

मुंबईत वानखेडे मैदानावर आज झालेल्या सामन्यात इटलीनं श्रीलंकेवर १० गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><>//**